जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे




दैनिक | वर्ष १ | अंक १८१ | बुधवार, २१ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



## शिरूर येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी आमदारांच्या कुटुंबीयांचा भाजपमध्ये प्रवेश

**शिरूर, ता. २० :** यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शिरूरचे माजी आमदार पोपटराव गावडे यांचे सुपुत्र तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र गावडे, जिल्हा परिषदेच्या बालकल्याण समितीच्या सभापती सुनीता गावडे आणि शिरूरच्या माजी नगराध्यक्षा मनीषा गावडे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

भारतीय जनता पक्ष हा कार्यकर्त्यांचा पक्ष असून, पक्षातील प्रत्येक कार्यकर्त्याचा योग्य सन्मान राखला जातो. आमदार राजेंद्र गावडे यांनाही पक्षात योग्य तो सन्मान मिळेल, अशी ग्वाही राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. पुणे जिल्ह्यातील पक्षप्रवेश कार्यक्रमात ते बोलत होते.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासकामांच्या झंझावाता मुळे संपूर्ण देशात त्यांच्याबद्दल मोठे प्रेम निर्माण झाले असून, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गतिमान व विकासाभिमुख सरकार मुळे महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाला भरभरून प्रतिसाद मिळत आहे, असे हि पाटील म्हणाले.

पक्षप्रवेशावेळी बोलताना बालकल्याण समितीच्या सभापती सुनीता गावडे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढवण्यासाठी गावडे कुटुंबाने प्रामाणिकपणे आणि कठोर परिश्रम घेतले; मात्र पक्ष नेतृत्वाकडून अपेक्षित सन्मान व न्याय मिळाला नाही. भाजपचा विकासाचा स्पष्ट अजेंडा आणि कार्यकर्त्यांना मिळणारा मान-सन्मान यामुळेच आम्ही भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

# उरुळी कांचन गटातून जितेंद्र बडेकर की शंकर बडेकर?

## राष्ट्रवादी काँग्रेसकडून तिकीट मिळवण्यासाठी दोघांमध्ये रस्सीखेच सुरु

## उमेदवारांना शेवटच्या क्षणी एबी फॉर्म

**हनुमंत चिकणे**

उरुळी कांचन, ता. २० : जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पूर्व हवेलीतील उरुळी कांचन - सोरतापवाडी गटात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये तिकीट वाटपावरून अंतर्गत रस्सीखेच सुरू झाल्याचे चित्र आहे. इच्छुक उमेदवारांची संख्या वाढल्याने पक्ष नेतृत्वासमोर तिकीट वाटपाचा पेच निर्माण झाला आहे. एकाच गटातून एकापेक्षा अधिक दावेदारांनी जोरदार लॉबिंग सुरू केल्याने पक्षातील अस्वस्थता उघडपणे समोर येत आहे.

या गटात अजित पवार गटासमोर उमेदवारी निश्चित करण्याचे मोठे आव्हान आहे. उरुळी कांचनचे माजी उपसरपंच जितेंद्र बडेकर व विद्यमान सदस्य शंकर बडेकर यांच्यात राष्ट्रवादी पक्षाकडून तिकीट मिळवण्यासाठी मोठी स्पर्धा सुरु झाली आहे. जितेंद्र बडेकर व शंकर बडेकर या दोघांनीही आमदार माऊली कटके यांच्याकडे उमेदवारी मागितली आहे. जितेंद्र बडेकर यांना कामाचा अनुभव असला तरी शंकर बडेकर हे विद्यमान ग्रामपंचायत सदस्य असून मागील पाच वर्षांपासून उरुळी कांचन परीसरातील काही कामे मार्गी लावली आहेत. एकाच गटातून व एकाच गावातून दोन नेत्यांनी उमेदवारी मागितल्याने राष्ट्रवादी अजित पवार गटासमोर कोणाला उमेदवारी द्यायची असा प्रश्न पडला आहे. तर कोणाला तिकीट मिळणार याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

जर राष्ट्रवादी पक्षाकडून जितेंद्र बडेकर व शंकर बडेकर यांना तिकीट नाकारण्यात आले तर दोघांपैकी एकाकडून मोठे बंड होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कोविडच्या काळात



जितेंद्र बडेकर



शंकर बडेकर

दोघांनीही केलेले काम ही त्यांची जमेची बाजू आहे. दोघांनीही शिरूर हवेलीचे माजी आमदार अशोक पवार यांच्या विरोधात बंड पुकारून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना खंबीर साथ दिली होती. तिकीट फायनल झाल्यास या दोघांतील एक बडेकर तटस्थ राहणार का वेगळ्या पक्षाकडे जाणार याची चर्चा जोर धरू लागली आहे. त्यामुळे पक्ष नेतृत्वाकडून सर्वेक्षण, कामगिरी आणि जिंकण्याची क्षमता या निकषांवर तिकीट वाटप होईल, असे संकेत देण्यात आले आहेत. मात्र, गटबाजी आणि अंतर्गत मतभेद लक्षात घेता निर्णय प्रक्रिया आव्हानात्मक ठरण्याची शक्यता आहे. वरिष्ठ नेत्यांकडून नाराजांची समजूत काढण्याचे प्रयत्न सुरू असून, अंतिम यादी जाहीर होईपर्यंत पक्षात घडामोडींना वेग येणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. दरम्यान, स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांच्या बैठका, बंद दरवाजाआड चर्चा आणि वरिष्ठ नेत्यांवर दबाव टाकण्याचे प्रकार सुरू असल्याचे समजते. तिकीट वाटपात अन्याय झाल्यास काय होणार याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे. पक्ष एकसंध ठेवण्यासाठी वरिष्ठ नेते नाराजांची मनधरणी करण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र अंतिम यादी जाहीर झाल्यानंतरच खरे चित्र स्पष्ट होणार असून, राष्ट्रवादीतील अंतर्गत राजकारण तापण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

### उमेदवारांना शेवटच्या क्षणी एबी फॉर्म

पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपकडून इच्छुकांची संख्या मोठी आहे. त्यामुळे उमेदवारी न मिळालेल्यांनी बंडखोरी करून अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरू नये, तसेच त्यांना इतर पक्षांकडून तिकीट मिळू नये, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपने महापालिका निवडणुकीप्रमाणेच शेवटच्या दिवशी म्हणजे बुधवारी एबी फॉर्म देण्याचा निर्णय घेतलाय.

अर्ज भरण्यासाठी केवळ एक दिवसांचा अवधी उरला आहे. अनेक ठिकाणी इच्छुकांची संख्या मोठी असल्याने पक्षांतर्गत नाराजी आणि बंडखोरीची शक्यता लक्षात घेऊन खबरदारी म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. उमेदवारांच्या हातात एबी फॉर्म शेवटच्या क्षणी देण्यात येणार असल्याने अधिकृत उमेदवाराशिवाय कोणीही अर्ज दाखल करू शकणार नाही, असा पक्षाचा अंदाज आहे.

## शिंदे-अजित पवारांचा गेम भाजपाच करणार : नाना पटोले

**मुंबई, ता. २० :** मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजपा आणि शिंदे गटाच्या युतीला यश मिळाल्यानंतर आता महापौर पदावरून राजकीय हालचालींना वेग आला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या नगरसेवकांना मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये थांबवले असल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. याच पार्श्वभूमीवर शिंदे गटाकडून भाजपाला अडीच वर्षांसाठी महापौरपदाचा प्रस्ताव देण्यात आल्याची चर्चा सुरू आहे.

या घडामोडींवर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी तीव्र प्रतिक्रिया देत, एकनाथ शिंदे आणि अजित पवारांचा गेम भाजपाच करणार, असे वक्तव्य केले आहे. त्यांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना तोंड फुटले आहे.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीनंतर सुरू असलेल्या हॉटेल पॉलिटिक्सबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारला असता, नाना पटोले म्हणाले, आम्ही याआधीच सांगितले होते की अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचा शेवटी गेम भाजपाच करेल. सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोस दौऱ्यावर आहेत. त्याचवेळी दिल्लीहून आदेश येत आहेत की मुंबईत भाजपाचाच महापौर होईल आणि कोणाचंही ऐकलं जाणार नाही, अशा बातम्या समोर येत आहेत. मात्र, अजूनही मोठ्या घडामोडी घडणार आहेत.


ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्राच्या राजकारणात येत्या आठ दिवसांत मोठे उलटफेर पाहायला मिळतील. राज्यातील जनतेला काँग्रेसचीच सत्ता हवी आहे. जर बॅलेटवर मतदान झालं, तर जनता योग्य निर्णय घेईल.पिंपरी-चिंचवड, पुणे, नवी मुंबई आणि ठाणे या भागांचा उल्लेख करत नाना पटोले यांनी दावा केला की, या ठिकाणी आधी अजित पवार आणि शिंदे गटाचं वर्चस्व होतं.

## शेतकऱ्यांचे जमिनीचे वाद कायमचे मिटणार

### सलोखा योजनेअंतर्गत दोन हजार रुपयांत जमिनीची अदलाबदल होणार

**पुणे, ता. २० :** ग्रामीण भागात शेतजमिनीच्या ताबा व वहिवाटीवरून वर्षानुवर्षे सुरू असलेले वाद मिटवण्यासाठी राज्य सरकारने सलोखा योजनाला मुदतवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या योजनेची वैधता आता जानेवारी २०२७ पर्यंत वाढवण्यात आली असून, त्यामुळे राज्यातील हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. न्यायालयात न जाता परस्पर संमतीने जमिनीचे वाद सोडवण्याची सुवर्णसंधी या योजनेमुळे उपलब्ध झाली आहे.

ग्रामीण महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जमिनी एका व्यक्तीच्या नावावर असल्या तरी प्रत्यक्ष ताबा दुसऱ्याच शेतकऱ्याकडे असल्याचे चित्र आहे. या ताबा-वहिवाटीच्या वादांमुळे शेतीची कामे खोळंबतात, कौटुंबिक व सामाजिक तणाव निर्माण होतो आणि प्रकरणे



वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबित राहतात. याचा फटका वेळ, पैसा व मानसिक त्रासाच्या स्वरूपात थेट शेतकऱ्यांनाच बसतो.

या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेली सलोखा योजना शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरत आहे. ज्या प्रकरणांत एका शेतकऱ्याच्या नावावरील जमीन दुसऱ्याच्या प्रत्यक्ष ताब्यात आहे आणि दोन्ही बाजूंची संमती आहे, अशा जमिनींची कायदेशीर अदलाबदल या योजनेअंतर्गत करता येते. विशेष म्हणजे या व्यवहारासाठी केवळ दोन हजार रुपये खर्च येतो. यामध्ये एका हजार रुपये नोंदणी शुल्क आणि एक हजार रुपये मुद्रांक शुल्काचा समावेश आहे. अन्यथा बाजारमूल्यानुसार लाखो रुपयांची स्टॅम्प ड्युटी भरावी लागली असती.

या योजनेचा आणखी एक फायदा म्हणजे प्रकरण थेट तहसील कार्यालयातच निकाली काढता येते. त्यामुळे वकिलांची फी, वारंवार तारखांची धावपळ आणि दीर्घकाळ चालणारी न्यायालयीन प्रक्रिया टळते. परिणामी शेतकऱ्यांचा वेळ व पैसा वाचतो.

योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित जमिनीवर किमान १२ वर्षांपासून प्रत्यक्ष ताबा असणे आवश्यक असून, ही योजना केवळ शेतजमिनीसाठी लागू आहे. दोन्ही शेतकऱ्यांची लेखी संमती अनिवार्य आहे. दरम्यान, जमिनीच्या वादांमुळे गावागावांत निर्माण होणारे तणाव, भांडणे व वादविवाद कमी करण्यास सलोखा योजना उपयुक्त ठरणार आहे. परस्पर संमतीने वाद मिटल्याने ग्रामीण भागात सामाजिक सलोखा व शांतता प्रस्थापित होण्यास मदत होणार आहे. २०२७ पर्यंत मुदतवाढ मिळाल्याने अधिकाधिक शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



## ब्लिंकिटवरून मागविलेल्या गुळाच्या ढेपेत आढळली गुटख्याची पुडी

**लोणी काळभोर, ता. २० :** आधुनिक युगात वेळ वाचावा म्हणून अनेक जण ऑनलाईन रिंच्यिा माध्यमातून घरबसल्या सामान मागवीत आहेत. परंतु, तुम्ही ऑनलाईन सामान मागवीत असाल तर आताच सावध व्हा. अन्यथा तुम्हालाही पश्चाताप सहन करावा लागणार आहे. ब्लिंकिट या वेबसाईडवरून मागवलेल्या गुळाच्या ढेपेत चक्क विमलची पुडी आढळल्याची धक्कादायक प्रकार लोणी काळभोर (ता. हवेली) येथील एका ग्राहकाला मंगळवारी (ता.२०) आला आहे. त्यामुळे ऑनलाईन सामान खरेदी करण्यापूर्वी विचार करण्याची वेळ आली आहे.

येथील एका प्रतिष्टीत व्यक्तीने व्होल फार्म या कंपनीचा गुळ ब्लिंकिट या वेबसाईडवरून मागवला होता. गुळाची डिलिव्हरी मिळाल्यानंतर गुळ फोडून बारीक करण्याचे काम सुरु होते. गुळाची ढेप चिरल्यानंतर त्यामध्ये चक्क विमल गुटख्याची पुडी आढळून आली आहे. गुळात गुटख्याची पुडी आढळून आल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन संबंधित कंपनीवर कारवाई करावी.

# लोणी काळभोर गटात राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटासाठी महिला उमेदवारांमध्ये जोरदार चुरस

## गणात रेश्मा काळभोर यांना तिकीट निश्चित; नाराज उमेदवार बंडखोरी करणार?


**विशाल कदम**

लोणी काळभोर, ता. २० : लोणी काळभोर जिल्हा परिषद गटात राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून अधिकृत उमेदवाराचे तिकीट जाहीर केले नसल्याने उमेदवारीसाठी अनिता गवळी, शीतल कांबळे व पूनम गायकवाड यांच्यात जोरदार रस्सीखेच सुरू असल्याचे दिसून येत आहे. तिन्ही उमेदवारांकडून तिकिटासाठी जोरदार प्रयत्न सुरू असून पक्षांतर्गत स्पर्धा तीव्र झाली आहे.


दुसरीकडे, भाजपकडून मात्र अद्याप या गटासाठी कोणत्याही उमेदवाराचे नाव अधिकृतरीत्या समोर आलेले नाही. पक्षाकडून संभाव्य उमेदवारांची चाचपणी सुरू असल्याची चर्चा असली तरी पक्षाने आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे भाजपकडून कोणाला उमेदवारी मिळणार, याकडे मतदारांसह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. परंतु, या गटातून सुद्धा पूनम गायकवाड निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक आहेत. तर लोणी काळभोर पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी पक्षाकडून रेश्मा युवराज काळभोर यांना तिकीट मिळणार असल्याचे जवळजवळ निश्चित मानले जात आहे. तर कदम वाकवस्ती पंचायत समिती गणातून भाजप व राष्ट्रवादी पक्षाकडून इच्छुक उमेदवारांची सरबत्ती लागली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून अनिता गवळी, शीतल कांबळे, पूनम गायकवाड व सिंपल कांबळे या इच्छुक उमेदवारांनी कार्यकर्त्यांशी संपर्क वाढवला असून मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रचाराची रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. पक्षाच्या स्थानिक नेत्यांमध्येही या तीन नावांबाबत चर्चा रंगू लागल्या असून अंतिम निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. परंतु, लोणी काळभोर जिल्हा परिषद गटात यंदा चुरशीची लढत पाहायला मिळण्याची शक्यता निर्माण झाली असून राजकीय पक्षांनी आपली मोर्चेबांधणी सुरू केली आहे.


अनिता गवळी या गेल्या काही वर्षांपासून सामाजिक आणि




अनिता गवळी



शितल कांबळे



पूनम गायकवाड



रेश्मा काळभोर

राजकीय क्षेत्रात सक्रिय असून विविध विकासकामांमुळे त्यांची ओळख निर्माण झाली आहे. तर शीतल कांबळे यांनीही स्थानिक पातळीवर आपला जनसंपर्क भक्कम केला असून पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने काम केले आहे. तर पूनम गायकवाड व सिंपल कांबळे यांनीही प्रचाराचा धुमधडाका सुरु केला आहे. त्यामुळे राष्ट्रवादीकडून नेमकी कोणाला संधी मिळणार, याबाबत कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

हवेली पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या कदमवाकवस्ती गणात राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारीसाठी मोठी चुरस पाहायला मिळत आहे. या गणातून अमोल टेकाळे, भरत मिसाळ, अक्षय म्हस्के, विजय दाभाडे, प्रकाश भिसे आणि राहुल जोगदंड हे सहा जण इच्छुक असल्याने पक्ष नेतृत्वासमोर उमेदवार निवडीचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. तर भाजपकडून नुकुल शिंदे, राकेश लोंढे, भगवान साळवे व ज्ञानेश्वर नामुगाडे हे इच्छुक उमेदवार आहेत. मात्र दोन्ही पक्षांनी कोणताही अधिकृत उमेदवार जाहीर केलेला नाही.

लोणी काळभोर गणातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून रेश्मा काळभोर यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात आहे. त्यांच्या नावावर पक्षांतर्गत एकमत होत असल्याची चर्चा असून कार्यकर्त्यांमध्येही त्यांच्या उमेदवारीबाबत सकारात्मक वातावरण दिसत आहे. स्थानिक प्रश्नांची जाण आणि मजबूत जनसंपर्क ही त्यांची जमेची बाजू मानली जात आहे. विविध पक्षांमध्ये सध्यातरी उमेदवारीसाठी रस्सीखेच सुरू झाली असून इच्छुक उमेदवारांची संख्या वाढत चालल्याने राजकीय समीकरणे दिवसेंदिवस बदलत आहेत.

दरम्यान, लोणी काळभोर जिल्हा परिषद गट हा राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. स्थानिक विकासाचे प्रश्न, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य व शिक्षण या मुद्द्यांवर यंदाची निवडणूक लढवली जाणार असल्याचे चित्र आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत राजकीय हालचाली अधिक वेगवान होण्याची शक्यता आहे. आगामी काळात उमेदवारांची अधिकृत घोषणा होताच प्रचाराचा धुरळा उडणार असून लोणी काळभोर गटातील निवडणूक अधिकच रंगतदार ठरणार हे निश्चित आहे.

### नाराज उमेदवार बंडखोरी करणार?

उमेदवारीसाठी वाढलेल्या स्पर्धेमुळे अनेक इच्छुकांमध्ये नाराजीचे सूर उमटू लागले आहेत. इच्छुकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. तिकीट न मिळाल्यास काही नाराज उमेदवार बंडखोरी करण्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे अधिकृत यादी जाहीर झाल्यानंतर राजकीय वातावरण आणखी ढवळून निघण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे पक्ष नाराज उमेदवारांची नाराजी दूर कशी करणार? हेही या निवडणुकीत महत्वाचे ठरणार आहे.

# महाराष्ट्र भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस : देवेंद्र फडणवीस

## पहिल्याच दिवशी १४ लाख ५० हजार कोटी गुंतवणुकींचे १९ सामंजस्य करार

**दावोस, ता. २० :** भारतातील उद्योग आणि गुंतवणूक क्षेत्रासाठी महाराष्ट्रच गेटवे-ऑफ-इंडिया असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान खरे ठरवणारे तब्बल १४ लाख ५० हजार कोटींचे गुंतवणूक करार पहिल्याच दिवशी करण्यात आले. या गुंतवणुकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या माध्यमातून यंदा विविध विभागांनी आणि विविध क्षेत्रातील उद्योगांच्या प्रतिनिधी समवेत मुख्यमंत्री फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

हरित ऊर्जा, अन्न प्रक्रिया, पोलाद निर्मिती, आयटी-आयटीईस, डाटा सेंटर्सह ईव्ही- ऑटोमोबाईल, जहाज बांधणी, डिजिटल इन्फ्रा अशा विविध क्षेत्रातील ही गुंतवणूक मुंबईसह राज्याच्या रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या भागात पोहोचणार असल्याने, तेथे उद्योग वाढीसह मोठ्या प्रमाणा रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे प्रतिनिधीमंडळ दावोस येथे उपस्थित आहे. दावोस मधील पहिल्याच दिवसापासून जगभरातील विविध क्षेत्रातील उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दर्शवणे सुरु केले. यातून गुंतवणुकीचा मोठा ओघ सुरु झाल्याने महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये




उत्साहाचे चित्र निर्माण झाले.

तत्पूर्वी, दावोस मधील महाराष्ट्र पॅव्हेलियनचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. भविष्याचे वेध घेण्यासाठी सज्ज, विश्वासार्ह आणि दीर्घकाळचा भागीदार म्हणून महाराष्ट्र स्वागत करीत आहे. भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस म्हणून महाराष्ट्र जगाला, उद्योग विश्वाला साद घालत आहे, अशी मनोदय भावनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली.

सामंजस्य करारांवरील स्वाक्षरी व करारांच्या आदान-प्रदान प्रसंगी झालेल्या चर्चेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रावरील उद्योग क्षेत्राचा, गुंतवणुकदारांचा हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आम्ही सदैव सज्ज आहोत. येथे होणाऱ्या करारांवरील पुढील कार्यवाहीबाबत वॉर रूमच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येईल. उद्योजकांना आवश्यक सुविधा वेळेत आणि दर्जदार पद्धतीने मिळाव्यात याची काळजी घेतली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

उद्योजक गुंतवणूकदारांकडून मिळत असलेला प्रतिसाद पाहता, यंदा गतवर्षीहून अधिक गुंतवणूक आणि रोजगार संधीचे सामंजस्य करार होतील असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. विशेषतः मुंबईतील घन कचरा व्यवस्थापन, हवा आणि पाणी गुण संनियत्रणाच्या माध्यमातून सर्क्युलर ईकॉनॉमीची संरचना उभी केली जात आहे. तसेच महाराष्ट्र हे अमर्याद संधीचे राज्य आहे. त्याबाबत आणि एमएमआर क्षेत्राच्या विकासासह, तिसऱ्या मुंबईच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार समितीने आराखडा निश्चित करून दिला आहे. या माध्यमातून व्यवसायाच्या आणि चांगल्या पगाराच्या रोजगार निर्मितीवर भर दिला जात असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

दरम्यान, आगामी दोन दिवसात दावोसमध्ये एआय, क्वांटम कंम्प्युटींग, डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर, यांसह फिनटेक, लॉजिस्टिक्स अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर तसेच जहाज बांधणी, ईव्ही, अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील आणखी काही उद्योग घटकांशीही गुंतवणुकीचे सामंजस्य करार होणार आहेत. त्यादृष्टीने त्यांच्या प्रतिनिधींशी, बोलणी -चर्चांच्या फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत.

## संक्षिप्त



### मुंबईत महायुतीचाच महापौर होणार : फडणवीस : शिंदेंशी फोनवरून चर्चा

**मुंबई, ता. २० :** मुंबई महापालिका निवडणुकीत सत्ताधारी भाजप व शिंदे गटाला स्पष्ट बहुमत मिळालेय. पण महापौर कोणत्या पक्षाचा होणार? या मुद्यावरून दोन्ही पक्षांत जोरदार रस्सीखेच सुरू झालीय. त्यातच आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी फोनवरून संवाद साधल्याची माहिती समोर आलीय. त्यामुळे फडणवीस दावोस दौऱ्यावरून परतल्यानंतर मुंबईच्या महापौरपदाचा तिढा सुटणार असल्याचे स्पष्ट झालेय. मुंबई महापालिकेत भाजपला सर्वाधिक ८९ जागा मिळाल्या. तर शिंदे गटाला २९, ठाकरे गटाला ६५, तर काँग्रेस व मनसेला अनुक्रमे २४ व ६ जागांवर समाधान मानावे लागले. भाजपला आपल्या मदतीशिवाय महापौर बनवणे अशक्य असल्याचे लक्षात येताच शिंदेंनी आपल्या नगरसेवकांना मुंबईतील पंचतारांकित हॉटेलात हलवलेय. त्यानंतर त्यांनी भाजपपुढे अडीच वर्षांच्या महापौरपदाचा प्रस्ताव ठेवून दबाव टाकण्याचा प्रयत्न सुरू केलाय. शिंदेंच्या या डावपेचामुळे मुंबीचा महापौर कोण होणार? हा प्रश्न कळीचा बनलाय. या पार्श्वभूमीवर सूत्रांनी देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदेंशी फोनवरून संवाद साधल्याचा दावा केलाय.

### शेअर बाजाराच्या आमिषाने ज्येष्ठ नागरिकाची कोट्यवधींची सायबर फसवणूक

**पुणे, ता. २० :** शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी एका ज्येष्ठ नागरिकाची २२ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ८८ वर्षीय ज्येष्ठ नागरिक मूळचे गुरुग्राममधील आहेत. ते मगरपट्टा सिटी परिसरात राहायला आहे. त्यांचा मुलगा आणि सून हे माहिती -तंत्रज्ञान कंपनीत कामाला आहेत. हडपसरमधील औद्योगिक वसाहतीत छोटा कारखाना होता. करोना काळात कारखान्याची विक्री करण्यात आली. कारखाना विक्रीतून त्यांना मोठी रक्कम मिळाली. गेल्या मोबाइल क्रमांकावर गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात सायबर चोरट्यांनी संपर्क साधला. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष चोरट्यांनी त्यांना दाखविले. चोरट्यांच्या खात्यात त्यांनी सुरुवातीला काही रक्कम गुंतविली. चोरट्यांनी सुरुवातीला त्यांच्या खात्यात काही रक्कम जमा केली. रक्कम जमा केल्यानंतर चोरट्यांनी परतावा दिल्याचे भासविले. प्रत्यक्षात त्यांना परतावा दिला नाही. ज्येष्ठ नागरिकाने चोरट्यांच्या वेगवेगळ्या बँक खात्यात वेळोवेळी २२ कोटी तीन लाख २२ हजार रुपये जमा केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्वप्नाली शिंदे तपास करत आहेत.

### कारवाईची भीती दाखवून महिलेची फसवणूक

**पुणे, ता. २० :** काळ्या पैसे व्यवहारात कारवाईची भीती दाखवून महिलेची सायबर चोरट्यांनी चार लाख  हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत एका  वर्षीय महिलेने सायबर पोलसी ठाण्यात फिर्याद दिली आहे. महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार महिला कोंढवा भागात राहायला आहे. सायबर चोरट्यांनी महिलेच्या मोबाइल क्रमांकावर डिसेंबर महिन्यात संपर्क साधला होता. काळ्या पैसे व्यवहारात बँक खात्याचा वापर करण्यात आला आहे. या प्रकरणात पोलिसांकडून कारवाई करण्यात येणार असल्याची भीती दाखवून चोरट्यांनी महिलेला अटक टाळण्यासाटी तातडीने पैसे जमा करावे लागतील, असे सांगितले. महिलेने चोरट्यांच्या खात्यात पैसे जमा केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस निरीक्षक संगीता देवकाते तपास करत आहेत.

### केवायसी करूनही लाडकी बहीणचा हप्ता का रखडला?

**पुणे, ता. २० :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा डिसेंबर महिन्याचा हप्ता अनेक महिलांच्या खात्यात अद्याप जमा झालेला नाही. विशेष म्हणजे, ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करूनही पैसे न मिळाल्याने लाभार्थी महिलांमध्ये गोंधळ आहे. प्रशासकीय सूत्रांनुसार, केवळ ई-केवायसी पुरेशी नसून कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त असल्यास अशा महिलांना अपात्र ठरवण्यात आलेय. ३१ डिसेंबरपर्यंत केवायसी करणे अनिवार्य होते. या प्रक्रियेत उत्पन्नाचे निकष न पाळणाऱ्या महिलांची नावे लाभार्थी यादीतून वगळण्यात आलीत. ज्या महिला निकषांत बसतात, त्यांना मकरसंक्रांतीला हप्ता मिळालाय. मात्र, अपात्र ठरलेल्यांचे पैसे कायमचे रोखले जाण्याची शक्यता आहे. आता पात्र महिलांचे लक्ष आगामी जानेवारी महिन्याच्या हप्त्याकडे लागलेय.

# रांजणगाव एमआयडीसीत पिकअप वाहनांचे टायर चोरी करणाऱ्या टोळीला अटक

**पुणे, ता. १९ :** रांजणगाव एमआयडीसी परिसरात गेल्या काही महिन्यांपासून पिकअप वाहनांचे टायर चोरीस जाण्याच्या घटनांमुळे वाहन मालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. रात्री उभ्या असलेल्या वाहनांचे चारही टायर काही तासांत गायब होत असल्याने औद्योगिक वसाहतीतील कामगार, वाहतूकदार आणि व्यापारी त्रस्त झाले होते.

कोरेगाव माता (ता. शिरूर) परिसरात एका पिकअप वाहनाचे चारही टायर चोरीला गेल्याची तक्रार दाखल झाल्यानंतर रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी त्वरित तपास सुरू केला. तपासादरम्यान शिरूर तालुक्यातील ५० हून अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आल्या, तसेच तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त




माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला.

या कारवाईत आव्हाळवाडी (ता. हवेली) आणि वाघोली परिसरातून चार आरोपींना अटक करण्यात आली. तपासात त्यांनी रांजणगाव एमआयडीसी, शिक्रापूर आणि शिरूर परिसरात अशाच प्रकारे टायर चोरी केल्याची कबुली दिली. आरोपी रात्री इर्टिगा कारमधून येत, पिकअप वाहनांचे टायर काही मिनिटांत काढून पसार होत असल्याचे उघड झाले.

पोलिसांनी आरोपींकडून १४ पिकअप वाहनांचे टायर आणि चोरीसाठी वापरलेली इर्टिगा कार जप्त केली असून, या मुद्देमालाची किंमत सुमारे १० लाख रुपये आहे. या कारवाईत किमान चार गुन्हे उघडकीस आले आहेत. ही घटना औद्योगिक भागात वाहन सुरक्षा किती महत्त्वाची आहे, हे पुन्हा अधोरेखित करते. महागड्या टायरची सहज विक्री आणि अपुरी निगराणी याचा गैरफायदा घेत अशा टोळ्या सक्रिय होतात, असे या प्रकरणातून स्पष्ट झाले आहे. पोलिसांच्या यशस्वी कारवाईमुळे वाहन मालकांना दिलासा मिळाला असून, इतर चोऱ्यांचाही मागोवा लागण्याची शक्यता आहे.

ही कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या पथकाने पार पाडली. पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक अविनाश थोरात, सहायक फौजदार दत्तात्रय शिंदे, पोलीस कर्मचारी उमेश कुतवळ, योगेश गुंड, किशोर शिवणकर आणि अभिमान कोळेकर यांनी संयुक्तपणे तपास करून आरोपींना अटक केली. पुढील तपास अभिमान कोळेकर करत आहेत.

# अपघातानंतर फरफटत नेल्याचा प्रकार; सीसीटीव्हीत कैद

**पुणे, ता. २० :** संगमवाडी ते येरवडा रस्त्यावर किरकोळ अपघातानंतर मोटारचालक महिलेने एकाला फरफटत नेले. समाज माध्यमातून या घटनेची चित्रफीत प्रसारित झाल्यानंतर पोलिसांनी मोटारचालक महिलेला अटक केली. या प्रकरणी मोटारचालक महिला मेरसेदे रसुलीफर (वय ४५) हिला अटक करण्यात आली. या घटनेत राम लक्ष्मण राठोड (वय ३४) हे जखमी झाले. याप्रकरणी लक्ष्मीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती लक्ष्मीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोटारचालक महिला शनिवारी (१७ जानेवारी) येरवड्यातील सादलबाब दर्गा रस्त्याने संगमवाडीकडे निघाली होती. त्या वेळी तेथून निघालेल्या





मोटारचालक राम राठोड याच्याबरोबर किरकोळ अपघातानंतर वाद झाला. राठोड याने मोटार थांबवून मोटारचालक महिला मेरसेदे हिला मोटारीतून बाहेर येण्यास सांगितले. तिने मोटार सुरू ठेवली. मोटारीच्या समोर राठोड थांबले. मोटार सुरू ठेवल्याने राठोड यांनी मोटार अडविण्याचा प्रयत्न केला. मोटारचालक महिलेने मोटार पुढे नेली. प्रसंगावधान राखून राठोड यांनी बोनेट धरून ठेवले. मेरसेदे हिने मोटार दोन किलोमीटर पुढे नेली. या घटनेची चित्रफीत प्रसारित झाल्यानंतर तिला अटक करण्यात आली.

# बॅडमिंटन क्वीन सायना नेहवालची निवृत्तीची घोषणा

**मुंबई, ता. २० :** बॅडमिंटन क्वीन सायना नेहवाल हिने स्पर्धात्मक बॅडमिंटनमधून निवृत्तीची घोषणा केली. गेल्या दोन वर्षांपासून सायना गुडघ्याच्या समस्येमुळे त्रस्त होती. अखेर तिने शरीर साथ देत नसल्याचे म्हणत आपल्या कारकिर्दीला पूर्णविराम दिला. सायना गेल्या दोन वर्षांपासून बॅडमिंटनपासून दूर होती आणि तिचा शेवटचा सामना २०२३ मध्ये सिंगापूर ओपनमध्ये झाला होता.

एका पॉडकास्टमध्ये बोलताना सायनाने स्पष्ट सांगितले की, माझ्या गुडघ्याची दुखापत गंभीर असून मला संधिवात झाला आहे. सर्वोत्तम खेळ करण्यासाठी तुम्हाला दिवसाला ८ ते ९ तास सराव करणे आवश्यक आहे. परंतु, माझा गुडघा अवघ्या एक-दोन तासांतच माझी साथ सोडत होता. सूजही येत होते. त्यामुळे अधिक सराव



करणे, माझ्यासाठी अवघड झाले. जर तुमचे शरीर साथ देत नसेल, तर थांबणेच योग्य असते. पुढे सायनाने सांगितले की, माझ्या पालकांना आणि प्रशिक्षकांना आपल्या शारीरिक स्थितीबद्दल स्पष्ट कल्पना दिली होती. निवृत्तीच्या औपचारिक घोषणेपेक्षा, स्पर्धांमधील तिची अनुपस्थितीच चाहत्यांना सर्व काही सांगून जाईल, असा विश्वास तिने व्यक्त केला. सायना नेहवालने २०१२ च्या लंडन ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकून इतिहास घडवला होता. ऑलिम्पिकमध्ये बॅडमिंटन पदक जिंकणारी ती पहिली भारतीय ठरली. २०१६ च्या रिओ ऑलिम्पिकमध्ये तिला गंभीर दुखापत झाली होती, मात्र जिद्दीच्या जोरावर तिने पुनरागमन केले आणि २०१ मध्ये जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक पटकावले. त्यानंतर २०१८ मध्ये तिने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. मात्र लंडन  ऑलिंपिकमध्ये ब्रांझ मेडल जिंकून जगभरात भारताचं नाव उंचावणाऱ्या नेहवालने तिच्या कारकिर्दीचा अंत केल्याने चाहत्यांनी दुःख व्यक्त केले आहे.

# नितीन नबीन यांनी भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली

**नवी दिल्ली, ता. २० :** नितीन नवीन हे भारतीय जनता पक्षाचे १२ वे राष्ट्रीय अध्यक्ष बनले आहेत. दिल्लीतील भाजप मुख्यालयात झालेल्या समारंभात त्यांच्या नावाची औपचारिक घोषणा करण्यात आली. तसेच त्यांना औपचारिकरित्या या पदाची जबाबदारी सोपवण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि जेपी नड्डा यांच्यासह भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, प्रदेश भाजप अध्यक्ष आणि संघटना मंत्री या कार्यक्रमाला उपस्थित होते. नितीन नवीन यांना गृह मंत्रालयाने झेड-श्रेणीची सुरक्षा प्रदान केली आहे.

भाजप राष्ट्रीय अध्यक्षांच्या शपथविधी समारंभात पक्ष कार्यकर्त्यांना संबोधित करताना जेपी नड्डा यांनी नवीन पक्ष अध्यक्ष नितीन नवीन यांचे अभिनंदन



केले. ते म्हणाले, आजचा दिवस हा एक ऐतिहासिक क्षण आहे, कारण आमचे तरुण, उत्साही आणि प्रतिभावान श्री. नितीन नवीन जगातील सर्वात मोठ्या राजकीय पक्षाचे, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्षपद स्वीकारत आहेत. मी माझ्या आणि लाखो कार्यकर्त्यांच्या वतीने त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. या दिवशी मी आपल्या पंतप्रधानांचे आणि निवडणूक समितीच्या सदस्यांचेही आभार मानतो.दरम्यान, नितीन नबीन हे भाजपच्या इतिहासातील सर्वात तरुण अध्यक्ष आहेतच, परंतु पक्षात त्यांच्यापेक्षा वयाने मोठे असलेले अनेक वरिष्ठ मंत्री आणि सदस्य देखील आहेत, ज्यांना आधीच नितीन नबीन यांचे वय पाहून मूल्यांकन न करण्याचे, तर त्यांच्याशी व्यवहार करताना त्यांच्या पदाचे आणि पदाचे प्रोटोकॉल पाळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# शिरूरमध्ये उमेदवाराची उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आंदोलनात्मक एन्ट्री

**योगेश मारणे**

शिरूर, ता. १९ : शिरूर तालुक्यातील रांजणगाव गणपती पंचायत समिती गणाच्या निवडणुकीत यंदा राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले असून,पिंपरी दुमाला येथील संदीप शिवाजी सोनवणे या उमेदवाराने उमेदवारी अर्ज दाखल करताना केलेल्या अनोख्या आंदोलनात्मक प्रवेशाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.गळ्यात खिळ्यांचा पट्टा आणि कांद्याची माळ परिधान करून हा उमेदवार थेट शिरूर येथे अर्ज भरण्याच्या ठिकाणी दाखल झाला.

रांजणगाव गणपती जिल्हा परिषद गटामध्ये मूलभूत सुविधांचा अभाव, पाणी,रस्ते,वीज यांसारख्या नागरिकांच्या दैनंदिन समस्या, परिसरात वाढलेली बिबट्याची दहशत,कांदा बाजारातील घसरलेले दर आणि त्यामुळे अडचणीत



सापडलेले शेतकरी,या सर्व प्रश्नांकडे प्रशासन व राजकीय नेतृत्वाचे लक्ष वेधण्यासाठीच हा आंदोलनात्मक प्रकार केल्याचे रांजणगाव पंचायत समिती गणाचे उमेदवार संदीप सोनवणे यांनी सांगितले.


सामान्य शेतकरी आणि नागरिकांच्या वेदना या खिळ्यांच्या पट्ट्याप्रमाणे बोचऱ्या आहेत,तर कांद्याची माळ ही शेतकऱ्यांच्या दुःखाचं प्रतीक आहे, अशी प्रतिक्रिया यावेळी उमेदवाराने दिली.

या अनोख्या आणि लक्षवेधी एन्ट्रीमुळे संपूर्ण गणात निवडणूक चर्चेला उधाण आले असून,राजकीय हालचालींना वेग आला आहे.येत्या काळात रांजणगाव गणपती पंचायत समिती गणातील निवडणूक अधिकच चुरशीची ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

# नदीजोड प्रकल्पासाठी केंद्राने अर्थसहाय्य करावे; देवेंद्र फडणवीस यांची केंद्राकडे मागणी

**नवी दिल्ली, ता. २० :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याकरीता राज्य सरकारने सुरु केलेल्या नदीजोड प्रकल्पाच्या पुर्णत्वासाठी केंद्र सरकारने अर्थसहाय्य करावे, अशी मागणी राज्याच्या वतीने केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्याकडे करण्यात आली.

राज्यातील सिंचन प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी नवी दिल्ली येथे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्या उपस्थितीत विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री



गिरीष महाजन, जलशक्ती विभागाचे केंद्रीय सचिव कांताराव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यामध्ये सुरु असलेल्या सिंचन प्रकल्पांच्या कामाची माहिती केंद्रीय मंत्र्यांना देण्यात आली. सुरु असलेल्या कामाबाबत त्यांनी समाधानही व्यक्त केले. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत राज्यातील २९ प्रकल्पांचा समावेश करण्यात आला असून, यामध्ये कोकण पाटबंधारे विकास महामंडळाअंतर्गत ५, विदर्भ पाटबंधारे महामंडळा अंतर्गत ७, कृष्णा खोरे विकास महामंडळा अंतर्गत ९ आणि गोदावरी विकास महामंडळा अंतर्गत ४ तसेच तापी पाटबंधारे विकास महामंडळा अंतर्गत ४ प्रकल्पांची कामे सुरु असल्याचे केंद्रीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

यापैकी कृष्णा व गोदावरी प्रकल्पाअंतर्गत सुरु असलेल्या १३ प्रकल्पांपैकी दहा प्रकल्प पुर्ण झाले असल्याची माहिती मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बैठकीत दिली. बळीराजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत कृष्णा व गोदावरी महामंडळाच्या अंतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पांच्या कामापैकी १५ प्रकल्प पुर्ण झाले आहेत. उर्वरित दोन प्रकल्प पुर्ण करण्याकरीता विभागाचे प्रयत्न असून, या दोन्हीही योजनांच्या अंतर्गत सुरु असलेल्या कामांची गती वाढवून ही कामे पुर्णत्वास जाण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही केंद्रीय मंत्री सी.आर पाटील यांनी दिली.

अहिल्यानगर जिल्ह्यातील निळवंडे २ प्रकल्पाचे काम पूर्ण होवून यामध्ये पाणीसाठाही होत आहे. डाव्या व उजव्या कालव्यांची कामेही पूर्ण होत आहेत. प्रकल्पाच्या कालव्यांचे अस्तरीकरणाचे काम प्रगतीपथावर असून, पाण्याची वितरण व्यवस्था बंदिस्त करण्याचे धोरण घेण्यात आले असून, यासाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून निधी उपलब्ध व्हावा अशीही मागणी या बैठकीत करण्यात आली. यासाठी २ हजार ३८ कोटी रुपयांच्या निधीचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून, निधी उपलब्ध झाल्यास बंदिस्त नलिका वितरण प्रणालीव्दारे ६४ हजार २६० हेक्टर क्षेत्राचे काम जलदगतीने पुर्ण होईल असा विश्वासही या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

# फुरसुंगी येथे तरुणीला ब्लॅकमेल करून अत्याचार

**हडपसर, ता. २० :** फुरसुंगी परिसरात एका १९ वर्षीय तरुणीला ब्लॅकमेल करून तिच्याकडून पैसे व सोन्याची उकळपट्टी करत, नकार दिल्यानंतर वेळोवेळी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी फुरसुंगी पोलिसांनी नील भरत निंबाळकर (वय १९, रा. अष्टविनायक सोसायटी, फुरसुंगी) याला अटक केली आहे. पीडित तरुणीने दिलेल्या फिर्यादीवरून हा प्रकार जुलै २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत घडल्याचे समोर आले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तरुणी रिक्षामधून प्रवास करत असताना ती दुसऱ्या एका तरुणासोबत असल्याचे आरोपी नील निंबाळकरने पाहिले. त्यानंतर त्याने तरुणीला धमकावण्यास सुरुवात केली.

तुझ्या भावाला-बहिणीला फोन करून तू कोणासोबत फिरतेस, तुझं अफेअर आहे हे सगळ्यांना सांगतो, अशी धमकी देत आरोपीने तरुणीवर मानसिक दबाव टाकला. घरच्यांना प्रेमसंबंधाची माहिती मिळू नये, या भीतीचा फायदा घेत त्याने तरुणीला ब्लॅकमेल करत पैशांची मागणी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पीडितेकडे पैसे नसल्याने आरोपीने तिच्याकडून १०१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने घेतले. त्यानंतरही वारंवार पैशांची मागणी सुरूच ठेवण्यात आली. तरुणीने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपीने तिला धमकावत तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या सततच्या त्रासामुळे तरुणी तीव्र मानसिक तणावाखाली होती. अखेर धैर्य एकवटून तिने फुरसुंगी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपी नील निंबाळकर याला अटक केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नलावडे करत आहेत.

# राष्ट्रवादीकडून कोमल आव्हाळे यांना उमेदवारी जाहीर; युवराज काकडे करणार भाजपमध्ये प्रवेश?

## थेऊर-आव्हाळवाडी गटात होणार काँटे की टक्कर?

**लोणी काळभोर, ता. २० :** हवेली तालुक्यातील महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या थेऊर जिल्हा परिषद गटात निवडणुकीची रणधुमाळी आता वेगाने रंगू लागली आहे. राष्ट्रवादीने आपले उमेदवार निश्चित केले आहेत. पक्षाकडून या गटात कोमल आव्हाळे यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केली आहे. तर इतर पक्षांकडूनदेखील उमेदवार निश्चित होऊ लागले आहेत. या गटातील उमेदवार पल्लवी युवराज काकडे या भाजपमध्ये प्रवेश करून उमेदवारी अर्ज भरण्याची दाट शक्यता राजकीय जाणकरांनी वर्तवली आहे. तर अपक्षही उमेदवार युती करून निवडणूक लढविणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळत असल्याने यंदाची लढत तिरंगी ठरणार की बहुरंगी, याबाबत मतदारांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

शिरूर हवेलीचे आमदार ज्ञा-नेश्वर कटकेयांनी राष्ट्रवादी पक्षाकडून थेऊर जिल्हा परिषद गटातून कोमल संदेश आव्हाळे यांनी अधिकृत उमेद-वारी जाहीर केली आहे. तर पक्षाकडून थेऊर व आव्हाळवाडी पंचायत समिती गणातून सिद्धांत सचिन तुपे व सुषमा संतोष मुरकुटे यांना तिकीट दिले आहे. तर पल्लवी युवराज काकडे यांनी अजूनपर्यंत कोणत्या पक्षाकडून लढणार आहेत. याबाबत जाहीर केले नसले तरी युवराज काकडे यांनी थेऊर पंचायत समिती गणातून संग्राम मच्छिंद्र कोतवाल व आव्हाळवाडी गणातून दिपाली विकास कांचन हे दोन उमेदवार उभे केले आहेत.

भारतीय जनता पार्टीकडून अद्याप अधिकृत उमेदवारांची घोषणा न झाल्याने राजकीय चित्र अस्पष्ट आहे. थेऊर गटातून पल्लवी युवराज काकडे या निवडणूक लढविणार असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. त्या लवकरच भाजपमध्ये प्रवेश करून उमेदवारी घेणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यांच्या संभाव्य प्रवेशामुळे भाजपची ताकद वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.





या सर्व राजकीय घडामोडींमध्ये एक महत्त्वाचे नाव म्हणजे पुष्पलता प्रकाश सावंत. त्या थेऊर गटातून निवडणूक लढविणार हे निश्चित मानले जात असले तरी त्या अपक्ष म्हणून मैदानात उतरणार की कोणत्या पक्षाकडून, याबाबत अद्याप ठोस माहिती समोर आलेली नाही. तर थेऊर गणातून योगेश दत्तात्रय' काकडे व आव्हाळवाडी गणातून पूनम अशोक गायकवाड हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. हे तिघेजण मिळून आघाडी करणार की स्वतंत्र लढणार? हे अजून स्पष्ट झाले नसल्याने त्यांच्या भूमिकेमुळे निवडणुकीची गणिते बदलण्याची शक्यता व्यक्त होत आहे. भाजपकडून संभाव्य उमेदवारांची चाचपणी, राष्ट्रवादीची आधीच झालेली मोर्चेबांधणी आणि अपक्ष उमेदवारांची शक्यता यामुळे थेऊर गटातील लढत चुरशीची ठरणार असल्याचे चित्र आहे. या गटातील सध्या सर्वांत मोठा प्रश्न म्हणजे मतदार कोणाला पसंती देणार? स्थानिक विकासकामे की पक्षीय राजकारण? अपक्ष उमेद-वार निर्णायक ठरणार का? या सर्व पार्श्वभूमीवर थेऊर गटातील निवडणूक ही यंदा प्रतिष्ठेची आणि चुरशीची ठरणार यात शंका नाही.

### विकासकामांचा अजेंडा ठरणार निर्णायक

थेऊर परिसरातील पाणीपुरवठा, अंतर्गत रस्ते, कचरा व्यवस्थापन, वाहतूक कोंडी, शैक्षणिक सुविधा आणि ग्रामविकासाचे प्रश्न यावेळी निवडणुकीचे प्रमुख मुद्दे ठरणार आहेत. उमेदवार विकासकामांचा कोणता अजेंडा घेऊन मतदारांसमोर येतात, यावर निकालाची दिशा अवलंबून राहील, असे राजकीय निरीक्षकांचे मत आहे.

# शिक्रापूर येथे पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणाची आत्महत्या

**शिक्रापूर, ता. २० :** पोलीस दलात भरती होण्याचं स्वप्न घेऊन पुण्यात आलेल्या एका तरुणाचा शिक्रापूर येथे दुर्दैवी मृत्यू झाला आहे. शिरूर तालुक्यातील शिक्रापूर परिसरात मित्राच्या खोलीत राहणाऱ्या २२ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या अनेक तरुणांमध्ये शोककळा पसरली आहे.



विरू संजय काळे (वय २२, रा. मोळाचा ओढा, सैदापूर, ता. जि. सातारा) असे मृत तरुणाचे नाव आहे. विरू हा सातारा जिल्ह्यातील रहिवासी असून पोलीस भरतीच्या तयारीसाठी तो पुण्यात आला होता. शिक्रापूर येथे त्याचा मित्र रणजीत साळुंखे राहत असून त्याच्याकडे विरू काही दिवसांपासून थांबला होता. त्याच खोलीत आदित्य साळेकर हा आणखी एक तरुणही परीक्षेच्या तयारीसाठी राहायला आला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या दोन दिवसांपासून तिघेही एकत्र खोलीत राहत होते. घटनेच्या दिवशी सायंकाळच्या सुमारास विरूने अचानक खोलीत दोरीने गळफास घेतल्याचे लक्षात आले. ही बाब समजताच मित्रांनी तातडीने त्याला खाली उतरवून जवळच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले.

या घटनेची माहिती विरूचे वडील विजय रामचंद्र काळे (वय ५१, रा. सैदापूर, सातारा) यांनी शिक्रापूर पोलिसांना दिली. त्यांच्या माहितीनुसार शिक्रापूर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. इतक्या लहान वयात मुलाने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याने कुटुंबावर मोठा आघात झाला आहे.

आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. शिक्रापूर पोलीस सर्व बाबींचा तपास करत असून शवविच्छेदन अहवाल आणि नातेवाईकांच्या जबाबांच्या आधारे पुढील कारवाई करण्यात येणार आहे. पोलीस भरतीसाठी मेहनत घेणाऱ्या तरुणाचा असा अंत झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# अपक्ष लढलो असतो तरी निवडून आलो असतो : नगरसेवक प्रशांत जगताप

**पुणे, ता. २० :** राज्यात महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसमधील फाटाफुट आणि पुन्हा झालेल्या एकत्रीकरणाने अनेक राजकीय समीकरणे बदलली. सत्तेसाठी वेगळे झालेले शरद पवार गट आणि अजित पवार गट पुन्हा एकत्र येत असल्याने स्थानिक पातळीवरील अनेक नेत्यांची राजकीय गणिते कोलमडली. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटातील माजी नगरसेवक प्रशांत जगताप यांनी राष्ट्रवादीला रामराम करत काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि पालिका निवडणुकीत विजयही मिळवला.



पुण्यात झालेल्या पत्रकार परिषदेत प्रशांत जगताप यांनी आपल्या राजकीय प्रवासावर आणि पक्षांतरामागील भूमिकेवर स्पष्टपणे भाष्य केले. २६ वर्ष ६ महिने १४दिवस मी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घालवले. शरद पवार भेटले की मी त्यांना नमस्कारच करेन, असे सांगत त्यांनी आपल्या जुन्या पक्षाबद्दल आदर व्यक्त केला. मात्र, विचारधारेमुळेच आपण काँग्रेसमध्ये गेलो, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

मी अपक्ष लढलो असतो तरीही निवडून आलो असतो. पण अपक्ष निवडून आल्यावर सुरू होणारी बोली मला नको होती. काँग्रेस कधीच भाजपमध्ये जाणार नाही, हे मला माहीत होते, म्हणून मी काँग्रेसमध्ये गेलो, असे सांगत त्यांनी पक्षांतरामागील भूमिका मांडली. भाजपविरोधात महाविकास आघाडी म्हणून लढण्याचा आपला विचार होता, मात्र राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणामुळे ते शक्य झाले नाही, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

जगताप यांनी निवडणुकीत काँग्रेसचे ७ नगरसेवक निवडून आणल्याचा उल्लेख करत राष्ट्रवादीवर अप्रत्यक्ष टीका केली. त्यांच्याकडे सत्ता आहे, उपमुख्यमंत्री पद आहे, तरीही त्यांना ते जमले नाही, असा टोला त्यांनी सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांना लगावला.

या घडामोडी महत्त्वाच्या ठरण्याचे कारण म्हणजे पुण्यासारख्या राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या शहरात काँग्रेस पुन्हा ताकदवान विरोधी पक्ष म्हणून उभी राहत असल्याचे संकेत मिळत आहेत. आगामी काळात महापालिकेतील सत्तासंघर्ष अधिक तीव्र होणार असून, भाजपविरोधात एक मजबूत राजकीय लढा उभा राहण्याची शक्यता आहे. पुण्याची लूट होऊ देणार नाही. माणसं बदलतात, पण विचारधारा कायम राहते, या शब्दांत जगताप यांनी आपली पुढील राजकीय दिशा स्पष्ट केली.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## हिवाळ्यात पालक आणि मेथी या भाज्यांचा आपल्या आहारात समावेश का करायला हवा

हिवाळ्यामध्ये आपल्या आहारामध्ये कोणते पदार्थ समाविष्ट करायला हवेत, याबाबत खूप सजग राहायला हवे. हिवाळ्यात आपली शारीरिक हालचाल मंदावते. त्यामुळे आपल्या खाण्यापिण्याच्या सवयींमध्येही बदल होतो. हिवाळ्यात वजनवाढण्यास सुरुवात होते. या अशा परिस्थितीमध्ये पालक आणि मेथीचे सूप एक उत्कृष्ट पर्याय मानला जातो. पालक आणि मेथीचे सूप हे लोह आणि फायबरने समृद्ध असते. तसेच या सूपमध्ये कॅलरीज खूप कमी प्रमाणात असतात. त्यामुळेच हे सूप हिवाळ्यात खूप पौष्टीक मानले जाते.

आरोग्य तज्ञांच्या मते, हिवाळ्यात पालक-मेथीचा सूप पिणे हा वजन कमी करण्याचा सर्वात प्रभावी उपाय आहे. पालक आणि मेथी दोन्ही फायबरचे पॉवरहाऊस आहेत. फायबर केवळ आपले पचन सुधारत नाही तर, या भाज्या खाल्ल्यामुळे आपले पोट अधिक काळ भरलेले राहते. पालक मध्ये कॅलरीजचे प्रमाण खूप कमी असते, तर मेथी शरीरात इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता सुधारते.

आरोग्य तज्ञांच्या मते, हिवाळ्यात पालक-मेथीचा सूप पिणे हा वजन कमी करण्याचा सर्वात प्रभावी उपाय आहे. पालक आणि मेथी दोन्ही फायबरचे पॉवरहाऊस आहेत. फायबर केवळ आपले पचन सुधारत नाही तर, या भाज्या खाल्ल्यामुळे आपले पोट अधिक काळ भरलेले राहते. पालक मध्ये कॅलरीजचे प्रमाण खूप कमी असते, तर मेथी शरीरात इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता सुधारते.

पालक मेथीचे सूप हिवाळ्यात पिण्याचे म्हणूनच भरमसाठ फायदे आहेत. या सूपमध्ये मुबलक प्रमाणात लोह, जीवनसत्त्वे अ, क आणि केतसेच पोटॅशियम असते. मेथीमध्ये आढळणारे गॅलेक्टोमनन हे संयुग हृदयाच्या आरोग्यासाठी चांगले आहे आणि भूक नियंत्रित करते. पालक हिमोग्लोबिनची पातळी वाढवून ऊर्जा पातळी देखील राखतो, वजन कमी करताना अशक्तपणा टाळतो.

**मेथी पालक सूप :** वजन कमी करण्यासाठी हे सूप बनवताना, जास्त प्रमाणात तेल किंवा बटर वापरणे टाळा. प्रथम, बारीक चिरलेली मेथी आणि पालक लसूण, आले आणि थोडी काळी मिरी घालून शिजवा. लसूण आणि आले यांचे मिश्रण थर्मोजेनिक प्रभाव निर्माण करते, शरीराचे तापमान वाढवते आणि कॅलरी बर्न करण्यास उत्तेजन देते. चवीसाठी थोडा लिंबाचा रस घाला, जो व्हिटॅमिन सी प्रदान करेल आणि लोह शोषण्यास मदत करेल.

# कुंजीरवाडीच्या शाळकरी मुलीचा आदर्श; रस्त्यावर सापडलेले सोन्याचे मंगळसूत्र केले परत

**लोणी काळभोर. ता. २० :** आजच्या काळात प्रामाणिकपणा दुर्मिळ होत चालला असताना कुंजीरवाडी येथील एका शाळकरी मुलीने दाखवलेला प्रामाणिकपणाचा आदर्श समाजासाठी प्रेरणादायी ठरला आहे. कु. रुद्रा धुमाळ हिने रस्त्यावर सापडलेले साडेतीन तोळ्यांचे सोन्याचे मंगळसूत्र प्रामाणिकपणे मालकाच्या ताब्यात देत आदर्श प्रस्थापित केला.

कुंजीरवाडी येथील प्रभावती धुमाळ या सकाळी नेहमीप्रमाणे पायी चालण्यासाठी बाहेर पडल्या होत्या. चालताना त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र नकळत रस्त्यावर पडले. घरी आल्यावर ही बाब लक्षात आल्यावर कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केली. त्यांचा मुलगा



रस्त्यावर मंगळसूत्र शोधत असताना कु. रुद्रा धुमाळ हिने ते सापडल्याचे सांगून कोणतीही अपेक्षा न ठेवता प्रामाणिकपणे परत केले. तिला देऊ केलेल्या खाऊच्या पैशांचा स्वीकारही तिने नम्रपणे नाकारला.

या प्रामाणिक कृतीची दखल घेत धुमाळ कुटुंबीय आणि स्व. विलास बापू तुपे फाऊंडेशन यांच्या वतीने ग्रामीण सर्वांगीण विकास विद्यालयात छोटेखानी सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात कु. रुद्रा हिचा सत्कार करण्यात आला. तिचे वर्गशिक्षक आणि मुख्याध्यापक यांचाही गौरव करण्यात आला. उपस्थितांनी रुद्रा हिच्या प्रामाणिकपणाचे तसेच तिच्या कुटुंबातील आणि शाळेतील संस्कारक्षम वातावरणाचे कौतुक केले.

कार्यक्रमासाठी प्रभावती धुमाळ यांचे कुटुंबीय, कु. रुद्रा धुमाळ हिचे कुटुंबीय, युवा नेते नयन तुपे, शाळेचे सचिव गोरख घुले, कुंजीरवाडी गावचे सरपंच हरेश गोठे, शाळेच्या मुख्याध्यापिका सुवर्णा सावंत कार्यालयीन अधीक्षक सुखदेव कंद, माऊली सावंत, मुकेश गायकवाड, विशाल वायकर, भाऊसाहेब जगताप, सागर तुपे, स्वप्नील कुंजीर, बापु धुमाळ, समस्त शिक्षकवृंद तसेच, पर्यावरण संरक्षण समिती व स्व विलास बापु तुपे फाऊंडेशनचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रामाणिकपणाचे झाड..

सामाजिक कार्यकर्ते विकास धुमाळ यांच्या संकल्पनेतून ग्रामीण सर्वांगीण विकास विद्यालय, पर्यावरण संरक्षण समिती, कुंजीरवाडी व स्व. विलास बापु तुपे फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कु रुद्रा हिच्या प्रामाणिकपणाचा आदर्श इतर मुलांसमोर रहावा आणि प्रामाणिकपणा अंगी जपण्याची प्रेरणा शाळकरी मुलांना कायम मिळावी या हेतूने शाळेच्या प्रांगणात १५ फुट उंचीची गावठी सोनचाफ्याची दोन झाडे लावण्यात आली.. आणि त्यांचे नामकरण प्रामाणिकपणाचे झाड असे करण्यात आले. पर्यावरण संरक्षण समिती, कुंजीरवाडी व स्व. विलास बापु तुपे फाऊंडेशन यांनी संयुक्तरित्या राबविलेल्या या अनोख्या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांनी कौतुक केले.

# दूध टाकण्याच्या बहाण्याने घरफोडी; विमानतळ पोलिसांकडून चोर अटकेत

**अमित मुंडीक**

पुणे, ता. २० : पुणे शहरातील विमानतळ पोलीस स्टेशन हद्दीतील एका उच्चभ्रू सोसायटीमध्ये दूध टाकण्याच्या बहाण्याने घरफोडी करणाऱ्या चोरट्याला विमानतळ पोलिसांनी अटक केली असून, त्याच्याकडून चोरीस गेलेली १ लाख ३२ हजार रुपयांची रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.

या प्रकरणी व्यंकटेश वसंत करंडे (वय ३४, रा. विद्यानगर, वडगावशेरी, पुणे) याला अटक करण्यात आली आहे. न्यू एअरपोर्ट रोड, विमाननगर येथील ॲगिनन्स बाय नाईकनवरे सोसायटीमध्ये राहणारे सूर्यनारायण राजरतिलम यांच्या



घरातून १७ जानेवारी २०२६ रोजी अज्ञात चोरट्याने १ लाख ३२ हजार रुपयांची चोरी केली होती. याप्रकरणी विमानतळ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ३१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३३१(३) व ३०५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान पोलीस उपनिरीक्षक नितीन राठोड व तपास पथकाने सोसायटीतील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. फुटेजमध्ये पहाटे सुमारे ५.३० वाजता दूध टाकण्यासाठी आलेला एक इसम संशयास्पद हालचाली करताना दिसून आला. या आधारावर तपासाची दिशा निश्चित करत पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला.

अखेर तपासाअंती आरोपी व्यंकटेश करंडे याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने घरफोडी केल्याची कबुली दिली असून, त्याच्याकडून चोरीस गेलेली संपूर्ण १ लाख ३२ हजार रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

ही कारवाई अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त सोमय मुंडे व सहाय्यक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या आदेशानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोविंद जाधव व पोलीस निरीक्षक शरद शेळकेयांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# जीवे मारण्याची धमकी देऊन महिलेवर लैंगिक अत्याचार

पुणे, ता. २० : पुण्यात एका महिलेवर जीवे मारण्याची धमकी देत लैंगिक अत्याचार, जबरदस्तीने दागिने काढून घेणे आणि पतीबरोबर झालेल्या वादाचा बदला घेण्यासाठी भावाकडून बलात्कार करवून घेण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या अमानुष गुन्ह्याप्रकरणी समर्थ पोलिसांनी सुमेश शंकर गेंदे (वय ३०, रा. पुयणी, ता. पालम, जि. परभणी) याला अटक कली असून त्याचा भाऊ निलेश गेंदे याच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून हा प्रकार २६ सप्टेंबर ते ५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत घडल्याचे समोर आले आहे. सुमेश गेंदे पुण्यात कामानिमित्त राहत असताना त्याने या महिलेचा विश्वास संपादन केला आणि नंतर तिच्यावर दबाव टाकण्यास सुरुवात केली. जीवे मारण्याची धमकी देत त्याने वेळोवेळी तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

इतक्यावरच न थांबता आरोपीने दमदाटी करून महिलेच्या कानातील सोन्याची फुले आणि तिच्या लहान मुलाच्या गळ्यातील सोन्याचे चक्र जबरदस्तीने काढून घेतले. हे दागिने विकून त्याने स्वतःच्या फायद्यासाठी वापरल्याचे तपासात उघड झाले आहे. या महिलेच्या पतीशी सुमेशचा वाद झाला होता. त्या भांडणाचा बदला घेण्यासाठी त्याने आणखी एक अमानुष कृत्य केले. त्याने आपल्या भावाला निलेश गेंदे याला या महिलेशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडले. या संपूर्ण प्रकारामुळे महिला भीती, मानसिक तणाव आणि अपमानाच्या गर्तेत सापडली होती.



# पानसरे हत्या प्रकरणातील मुख्य संशयित समीर गायकवाडचा मृत्यू

**सांगली, ता. २० :** ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य संशयित समीर गायकवाडचा आज सांगलीत मृत्यू झाला. प्रकृती बिघडल्यामुळे त्याला शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र उपचार सुरू असतानाच हृदयविकाराच्या तीव्र झटक्यामुळे त्याचा मृत्यू झाला, असे डॉक्टरांनी सांगितले.

समीर गायकवाड पानसरे हत्या प्रकरणातील एक महत्त्वाचा संशयित होता आणि खटल्याची सुनावणी अद्याप सुरू होती. १६ फेब्रुवारी २०१५ रोजी कोल्हापुरात गोविंद पानसरे यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर पोलिसांनी समीर गायकवाडला अटक केली होती. काही काळ तुरुंगात राहिल्यानंतर त्याला न्यायालयाने जामिनावर सोडले होते.

सुदैवाने, समीर गायकवाड जामिनावर असताना त्याचा मृत्यू झाला. त्याच्या अचानक निधनाने पानसरे हत्या प्रकरण पुन्हा एकदा राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चेत आले आहे. या घटनेमुळे खटल्यावर आणि पुढील कायदेशीर प्रक्रियेवर काय परिणाम होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सांगली पोलिस आता या मृत्यूच्या कारणांचा सविस्तर तपास करत आहेत.

# व्हायरल व्हिडिओ प्रकरणानंतर डीजीपी रामचंद्र राव निलंबित

**कर्नाटक, ता. २० :** कर्नाटकचे वरिष्ठ आयपीएस अधिकारी आणि डीजीपी पदावर कार्यरत रामचंद्र राव यांना सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या आक्षेपार्ह व्हिडिओ प्रकरणानंतर निलंबित करण्यात आले आहे. रामचंद्र राव हे राज्यातील डीजीपी (सिव्हिल राइट्स एन्फोर्समेंट) पदावर कार्यरत होते.

सोमवारी सोशल मीडियावर काही व्हिडिओ क्लिप मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्या. या क्लिपमध्ये रामचंद्र राव वेगवेगळ्या महिलांसोबत अश्लील वर्तन करत असल्याचे दिसत असल्याचा दावा करण्यात आला. हे व्हिडिओ समोर येताच प्रशासन आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. प्रकरण गंभीर असल्याने राज्य सरकारने तातडीने निलंबनाचा निर्णय घेतला.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना रामचंद्र राव यांनी सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. त्यांनी म्हटले, मी पूर्णपणे धक्क्यात आहे. हे व्हिडिओ बनावट आहेत. माझा त्यांच्याशी काहीही संबंध नाही. त्यांनी हे देखील सांगितले की आजकाल कोणाचाही फेक व्हिडिओ बनवणे शक्य आहे आणि ही त्यांची बदनामी करण्याची कटकारस्थान असू शकते.

रिपोर्ट्सनुसार, व्हिडिओ जुने असू शकतात का, असा सवाल विचारल्यावर १९९३ बॅचचे अधिकारी रामचंद्र राव म्हणाले, जुने असतील तर साधारण आठ वर्षांपूर्वीचे, म्हणजे मी बेलगावीमध्ये पोस्टिंगला असतानाचे असू शकतात. तरीही त्यांनी ठामपणे सांगितले की या व्हिडिओंचा त्यांच्याशी काहीही संबंध नाही.

व्हिडिओ प्रकरण बाहेर आल्यानंतर रामचंद्र राव यांनी राज्याचे गृह मंत्री जी. परमेश्वर यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला, परंतु ही भेट होऊ शकली नाही. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी प्रकरणावर कडक भूमिका घेत अधिकारी कोणत्याही पदावर असो, कायदा कोणासाठीही वेगळा नाही. प्रकरणाची चौकशी केली जाईल आणि त्यानंतर योग्य ती कारवाई केली जाईल, असे सांगितले.

हे प्रकरण अधिक चर्चेत आले कारण रामचंद्र राव हे अभिनेत्री रान्या राव यांचे वडील आहेत. रान्या रावला आधीच गोल्ड स्मगलिंग प्रकरणात अटक झाली होती. मार्च २०२५ मध्ये दुबईहून परत येताना तिला १४.८ किलो सोन्याचे बार जप्त करण्यात आले होते, ज्याची किंमत सुमारे १२.५६ कोटी रुपये होती. बेंगळुरूतील त्यांच्या घरातूनही २.०६ कोटींचे दागिने आणि २.६७ कोटी रुपये रोख जप्त केले गेले होते

# सुप्यात तरुणीची अमानुष हत्या करून मृतदेह नग्न अवस्थेत फेकला रस्त्यावर

**बारामती, ता. २० :** बारामती तालुक्यातील सुपा परिसरात एका २५ ते २७ वर्ष वयोगटातील तरुणीची अत्यंत अमानुषपणे हत्या करून तिचा मृतदेह नग्न अवस्थेत रस्त्याच्या कडेला फेकून दिल्याची घटना उघडकीस आली आहे. सुपे गावालगत असलेल्या काळखरेवाडी हद्दीतील खैरेपडळ परिसरात सोमवारी (ता. १९) पहाटे हि घटना उघडकीस आली आहे.

घटनेची माहिती मिळताच सुपा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. रस्त्यालगत रक्ताच्या थारोळ्यात पडलेला तरुणीचा मृतदेह पाहून नागरिक सुन्न झाले. प्राथमिक तपासात अंदाजे २५ ते २७ वयोगटातील या तरुणीवर अनोळखी व्यक्तीने धारदार शस्त्राने अत्यंत क्रूर हल्ला करून खून



केल्याचे स्पष्ट झाले आहे.

खून केल्यानंतर आरोपीने पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह रस्त्याच्या कडेला टाकून पळ काढल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळी फॉरेन्सिक तज्ज्ञ व श्वानपथक बोलावण्यात आले असून, आरोपीच्या शोधासाठी पोलिसांची पाच स्वतंत्र पथके तयार करण्यात आली आहेत. दरम्यान, हत्या नेमकी का केली? याबद्दल अधिक माहिती अद्याप समोर आलेली नाही.

दरम्यान, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल डेटा आणि आधुनिक तांत्रिक साधनांच्या आधारे तपास वेगाने सुरू असल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांनी दिली. या भीषण घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोजकुमार नवसरे करत आहेत.

# मुंबईच्या महापौरपदाबाबत दिल्लीतून निर्णय; ३० जानेवारीला भाजपचाच महापौर

**मुंबई, ता. २० :** देशाच्या आर्थिक राजधानीत असलेल्या मुंबई महानगरपालिकेवर अखेर भाजप आपला झेंडा फडकवण्यासाठी सज्ज झाली आहे. विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, येत्या ३० जानेवारीला मुंबईचा नवा महापौर भाजपचा असेल आणि त्याच दिवशी पदग्रहण सोहळाही पार पडेल.

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत ८९ जागा जिंकून भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. मात्र, सत्तेच्या ११४ या जादुई आकड्यापर्यंत पोहोचण्यासाठी त्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या २९ नगरसेवकांची साथ आवश्यक आहे. सध्या भाजपचे अनेक दिग्गज नेते राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्या पदग्रहण सोहळ्यासाठी दिल्लीत असून, तिथेच मुंबई महापालिकेच्या सत्तेचा अंतिम प्लॅन तयार झाला आहे.




गेल्या काही दिवसांपासून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाने भाजपवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला होता. पहिल्या अडीच वर्षांसाठी महापौरपद आम्हाला द्या, तरच पाठिंबा देऊ, अशी भूमिका शिंदे गटाची चर्चा होती. मात्र, दिल्लीतील भाजप नेतृत्वाने स्पष्ट केले आहे की महापौरपदाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. हा स्पष्ट संदेश मित्रपक्षाला देण्यात आला असून, सत्तेच्या वाटाघाटीवर भाजपची नो कॉम्प्रमाईज भूमिका ठाम राहणार असल्याचे संकेत आहेत.

यंदा मुंबई महापालिकेतील महापौरपदाच्या निवडीवर दिल्लीच्या खेळीमुळे सत्तासंघर्षाच्या रंगाचे सर्वसामान्यांपर्यंत चित्र स्पष्ट होत आहे. ३० जानेवारीला महापौरपदाच्या पदग्रहण सोहळ्याद्वारे मुंबईत भाजपच्या सत्तेची प्रतिमा ठामपणे उमलणार आहे.

# लोणी काळभोरमधील जॉयनेस्ट वसाहतीत सात वर्षीय मुलाला चिरडले

## एमआयटीच्या विद्यार्थ्याने दिलेल्या धडकेत चिमुकल्याचा जागीच मृत्यू

**लोणी काळभोर, ता. २० :** लोणी काळभोर येथील जॉयनेस्ट वसाहतीत सायकल खेळणाऱ्या एका ७ वर्षीय मुलाला चारचाकीतील एमआयटीच्या मुलाने चिरडल्याची घटना घडली आहे. आज सोमवारी (ता. १९) दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. अपघातानंतर चारचाकी चालकाला लोणी काळभोर पोलिसांनी ताब्यात घेतले असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

निष्कर्ष अश्वतरेड्डी (वय -७, रा. सध्या जॉयनेस्ट सोसायटी, लोणी काळभोर, ता. हवेली, मूळ रा. अद्याप माहिती मिळू शकली नाही) असे अपघातात मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे. तर अथर्व रमेश कवडे (वय २३ रा. सध्या माहिती नाही) असे चारचाकी चालकाचे नाव आहे. याप्रकरणी चालक तरुणाला लोणी काळभोर पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती मिळत असून लोणी काळभोर येथील एमआयटी या शैक्षणिक संकुलात शिक्षण घेत असल्याची माहिती मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सदरचा तरुण हा एमआयटी शिक्षण घेत आहे. जॉयनेस्ट येथे राहणाऱ्या आपल्या मित्राला सोडायला कवडे हा तरून चारचाकी घेऊन आला




होता. यावेळी मित्राला सोडल्यानंतर गाडी पाठीमागे घेत असताना सायकल खेळात मग्न असलेल्या निष्कर्ष रेड्डी याच्या सायकलला जोरदार धडक बसली.

यावेळी सदरचा मुलगा हा चारचाकी गाडीच्या डाव्या बाजूच्या चाकाखाली आला. त्यामुळे त्याच्या अंगावरून दोन्ही टायर गेले. या अपघातात मुलगा निष्कर्ष रेड्डी याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली व तो बेशुद्ध पडला. चारचाकी चालक अथर्व कवडे याने तात्काळ आपल्या गाडीत टाकून विश्वराज हॉस्पिटल या ठिकाणी उपचारासाठी दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. सदर घटनेची माहिती लोणी काळभोर पोलिसात देण्यात आली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे. ही घटना सोसायटीत घडली असल्याने सोसायटीतील सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

दरम्यान, या घटनेने सोसायटी परिसरात शोककळा पसरली असून संतप्त नागरिकांनी वाहनचालकांच्या बेफिकीर वर्तनावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पुढील माहिती घेण्यास सुरुवात केली आहे.